**केस नं.७६/पीडब्लू/२०२३** **निशाणी— १७**

**साक्षीदार क्र.३**

**मी शपथेवर सत्यनिवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| नाव | : सुरेश हरी राठोड |
| वय | : ४० वर्षे |
| व्यवसाय | : पो हवालदार |
| राहणार | : बदलापूर |

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी वकील श्रीमती. एस.डी. घाडगे यांचेमार्फत**

१. दिनांक ३०/०८/२०२३ रोजी मी मुंबई—१० या बोटीवर गस्तकामी हजर होतो. माझ्यासोबत पो.उ.नि. सुरेशचंद्र यादव आणि पोलीस शिपाई समद शेख होते. गस्तीदरम्यान आम्हाला जवाहर द्विप बेटासमोर जेट्टी क्र.४ समोर एमएल फिडीस बी.डी.आर. आयव्ही १०८ ही बोट उभी असल्याची दिसली. आम्ही तीच्यामध्ये गेलो. तीचे इंजिन रुम चेक केले असता त्यामध्ये १००० लिटरचृया दोन टाक्या दिसल्या. त्यातील एका टाकीमध्ये अंदाजे ६०० लिटर व दुस—या टाकीमध्ये अंदाजे ४०० लिटर डिझेल दिसले. पेपरची मागणी केली असता ते त्यांच्याकडे नव्हते. पोलीस शिपाई शेख यांनी पो.नि. सावंत यांना फोन करुन माहिती दिली. श्री. सावंत यांनी ती बोट भाउचा धक्का येथे आणावयास सांगितले. आम्ही ती भाउचा धक्का येथे घेउन आलो. त्या ठिकाणी ठाणे अंमलदार श्री. मदने आले. त्यांनी इंजिन रुम मध्ये जाउन टाक्या चेक केल्या. त्यांनी त्या टाक्यांमध्ये डिझेल असल्याची खात्री करुन त्याची माहिती वेसावे मॅडमना दिली. त्यांनी श्री. बोबडे यांना घटनेची माहिती दिली. त्यांनी येउन त्याचा पंचनामा केला. पो.शि. शेख याने पावती चेक केली. ती त्यांच्याकडे नव्हती. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो.

**आरोपीकरीता उलटतपास विधिज्ञ श्री. अखिल शेख यांच्यामार्फत :—**

२. घटनेच्या दिवशी माझा जबाब घेतला होता. मी बारावी पास आहे. हे खरे आहे की, मी पेट्रोलियम पदार्थातील तज्ञ नसल्याने जप्त मुद्देमाल हा डिझेलच होता

असे खात्रीपुर्वक सांगू शकत नाही. हे खरे आहे की, मुंबई—१० नौकेवर लॉग बुक असते. हे खरे आहे की, त्यादिवशी आम्ही गस्तीवर गेल्याबाबतची लॉगबुक नोंद दोषारोप पत्रात दाखल नाही. त्यादिवशी आम्ही २ ते ३ बोट चेक केल्या होत्या.

३. जप्त केलेल्या बोटीच्या टाक्यांची क्षमता मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, जप्त केलेल्या टाक्यांतील डिझेल मी अंदाजे सांगितले आहे. हे खरे आहे की, आम्ही ते डिझेल प्रत्यक्ष मोजले नव्हते. हे खरे आहे की, त्या बोटीचा पंचनामा जवाहर जेट्टी समोर झाला नाही. हे खरे आहे की, पंचनाम्यावरील पंचांची नावे मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, तो पंचनामा किती वाजता चालू करुन किती वाजता संपवला ते मला सांगता येत नाही.

४. हे खरे नाही की, त्यादिवशी मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे खरे नाही की, त्या बोटीतून कोणताही पेट्रोलियम पदार्थ जप्त केला नव्हता. हे खरे नाही की, भाउचा धक्का येथे पंचनामा झाल्याचे मी खेटे सांगत आहे. हे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझा जबाब नोंदविला नव्हता. हे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHOK UTTAMRAO BAHIR
Date: 2026.08.06 17:30:34 +0530

(अ. उ. बहिर)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
**दिनांक : ०६/०८/२०२६** ३८ वे न्यायालय, बलार्ड पिअर, मुंबई.